**CNR NO. MHSO060014542021**

नियमित दिवाणी दावा क्र.९१/२०२१
वसंत भिमराव घुले.
वि.
महाराष्ट्र सरकार व इतर.

## नि. क्र. ११६ वरील आदेश
## (घोषित दि.३१/०७/२०२३)

०१] प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे 'जैसे थे परिस्थीती' अपिल कालावधीपर्यंत ठेवण्याबाबत विनंती करण्याकरीता दाखल करण्यात आलेला आहे.

०२] प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्जास प्रखर विरोध करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] प्रस्तुतचा दावा हा वादीने निरंतर ताकीदी मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला असून वादीच्या हक्कात नि.क्र.५ चा आदेश होईपावेतो 'जैसे थे परिस्थीती' ठेवण्याबाबत आदेश अस्तीत्वात होते. आज वादीचा नि.क्र. ५ चा अर्ज नामंजूर करण्यात आलेला आहे. वादीतर्फे युक्तीवाद करण्यात आला की, या आदेशा विरुध्द मा. जिल्हा न्यायालयामध्ये अपिल करण्यापावेतो 'जैसे थे परिस्थीती' कायम ठेवण्यात यावी. वाद मिळकतीमध्ये वादीचे घर असून पूर्वी अस्तीत्वात असलेला 'जैसे थे परिस्थीती'चा आदेश लक्षात घेता जरी आजरोजी वादीचा नि.क्र. ५ चा अर्ज नामंजूर झालेला असला तरीही न्यायदानाच्या दृष्टीने वादीला सदर आदेशाविरुध्द अपिल दाखल करावयाचे असल्यामुळे १० दिवसांचा कालावधी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. अश्या परिस्थीतीत नि.क्र.५ निर्णित करण्यापूर्वी असलेला 'जैसे थे परिस्थीती'चा आदेश दि.१०/०८/२०२३ पावेतो कायम ठेवण्यात येतो.

०४] तद्नंतर सदरचा आदेश आपोआप रद्द होतील याची उभयपक्षांनी नोंद घ्यावी. हे म्हणणे खरे आहे की,

AMIT ASHOKRAO KHANDALE
Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE
Date: 2023.07.31 17:53:26 +0530

**दि.३१/०७/२०२३.** **(अमित अ.खंडाळे)**

**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**

**पंढरपूर.**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 31.07.2023 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 31.07.2023 |
| Judgment/Order uploaded | | |
| on | : | 31.07.2023 |